Thane

Mangrove 133


# ठाणे महानगरपालिका, ठाणे

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे- ४००६०२.

Phone : 022 25362916 E-mail : pcctmc.ho@gmail.com


जा. क्र. ठामपा/प्रनिक/ ८७८ /२०२२-२३ दिनांक : ०१.०३.२०२३

प्रति,
मा. सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक
कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय : तक्रारदार श्री. आदर्श कुमार यांची तक्रार क्र. १३३**

माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यक्षेत्रांतर्गत कोलशेत खालचा गाव या ठिकाणी कांदळवन क्षेत्रात झालेल्या बांधकामांची दि. २७/०४/२०२२ रोजी ठा.म.पा. कांदळवन समिती सदस्य सचिव तथा प्रदूषण नियंत्रण अधिकारी यांचे प्रतिनिधी, वन विभाग (कांदळवन) अधिकारी व माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अतिक्रमण विभागातील अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती. या पाहणीत खालील बांधकामे आढळून आली.

१) श्री. राकेश शेळके- अंदाजे ३५०० चौ. फुट बैठे कच्चे व पक्के बांधकाम

२) श्री कुणाल घरत अंदाजे ५२०० चौ. फुट बैठे कच्चे व पक्के ब्रांधकाम

३) श्री. भानुदास घरत व श्री. चेतन शेळके - अंदाजे ३००० चौ. फुट बैठे कच्चे व पक्के बांधकाम

वरील ठिकाणच्या कांदळवन क्षेत्रात असणाऱ्या या बांधकामाप्रकरणी उपरोक्त इसमांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४७८(१)(२) अन्वये नोटीस बजाविण्यात आल्या. तसेच दि. ०७/०२/२०२३ रोजी या बांधकामावर अतिक्रमण विभाग, माजिवडा मानपाडा प्रभाग समितीकडील पथक निष्कासन कारवाईसाठी गेले असता संबंधित अतिक्रमणधारक यांनी, त्यांनी केलेले अतिक्रमण स्वतः २४ तासाच्या आत काढून घेतो अशी विनंती केल्याने प्रस्तावित केलेली निष्कासन कारवाई तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आली.

दि. ०१/०३/२०२३ रोजी या कांदळवन क्षेत्रातील बांधकामांची पाहणी केली असता, बांधकामधारक यांनी बांधकामे काढून घेतली नसून बांधकामे अस्तित्वात आहेत. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये श्री. भानुदास घरत यांनी प्रस्तुत प्रकरणी ठाणे महानगरपालिकेविरुध्द मा. न्यायालयात RCS ९७/२०२३ दाखल केला असून मा. न्यायालयाने या दाव्याअंतर्गत बांधकामधारक यांना बांधकामासंबंधी सुनावणी घेऊन कायदेशीर प्रक्रिया (DPL) पूर्ण करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार वरील बांधकामासंबंधी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 576
दिनांक 06/03/2023
मुख्य लेखापाल
उप वनसंरक्षक

mpradhan
मनिषा प्रधान
मुख्य पर्यावरण अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे